**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जीडीपी वाढीचा दर आठ टक्के इतका वाढवण्याची गरज असल्याचं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन.**
2. **सायबर गुन्हेगारीविषयक जनजागृती मोहिमेचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन.**
3. **उद्या, 4 ऑक्टोबर रोजी 5 हजार 187 अनुकंपा उमेदवारांना शासकीय नोकरीची नियुक्तीपत्रे प्रदान केली जाणार.**
4. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मासिक रेडिओ कार्यक्रम 'मन की बात' ला आज ११ वर्षे पूर्ण.**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण**

विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जीडीपी वृद्धीचा दर आठ टक्के इतका वाढव ण्याची गरज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अधोरेखित केली. नवी दिल्ली इ थं कौटिल्य आर्थिक परिषदेच्या उद्घाटनाच्या सत्रात त्या बोलत होत्या. जागतिक अस्थिरते च्या परिस्थितीतही देशांतर्गत घटकांमुळे भारताची स्थिती भक्कम असून कोणताही धक्का स हन करण्याची देशाची क्षमता असल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

***For India, these dynamics highlight both vulnerability and resilience. Our capacity to absorb shocks is strong, while our economic leverage is evolving. Our choices will determine whether resilience becomes a foundation for leadership or merely a buffer against uncertainty.***

**अग्रीम हस्तांतरण**

केंद्र सरकारच्या वतीनं राज्य सरकारांना कराचं अग्रीम हस्तांतरण करण्यात आलं असून, त्यापैकी महाराष्ट्राला सहा हजार ४१८ कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. हे हस्तांतरण १० ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या सामान्य मासिक हस्तांतरणाव्यतिरिक्त आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. त्यांनी याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले. सणासुदीच्या हंगामासाठी, राज्याच्या भांडवली खर्चासाठी तसंच कल्याणकारी आणि विकास योजनांसाठी या निधीचा उपयोग होणार आहे.

**बिल गेट्स**

नाविन्य निर्मीतीतल्या भारताच्या कामगिरीचं मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी कौतुक केलं आहे. सिएटलमध्ये भारतीय महावाणिज्य दूतावास आणि गेट्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या १५६ व्या जयंतीनिमित्त झालेल्या एका कार्यक्रमात ते काल संबोधित करत होते. भारताने विकसित केलेल्या उपाययोजनांमुळे ग्लोबल साऊथ

राष्ट्रातल्या लाखो लोकांचं जीवन बदलवण्याची क्षमता आहे, असं गेट्स यांनी म्हटलं आहे. भारताच्या विकसीत भारत २०४७ या उद्दिष्टाच्या प्रवासात त्यांनी भारतासोबत भागीदारी सुरू ठेवण्याची आशा व्यक्त केली.

**फडणवीस/टीका**

उद्धव ठाकरे हे विकासावर एक शब्दही बोलू शकत नाहीत. दसरा मेळाव्यातील भाषणातही तसेच घडले. यात लोकांच्या प्रश्नांवर, विकासावर, लोककल्याणावर किंवा राज्याला आणि मुंबई महापालिकेला पुढे कसे नेणार यासंदर्भात उद्धव ठाकरेंनी अवाक्षरही काढले नाही. ते विकासावर बोलू शकत नाहीत हेच उद्धव ठाकरेंनी आपल्या दसरा मेळाव्यातून सिद्ध केल्याचा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला. ठाकरेंच्या दसरा मेळाव्यासंदर्भात माध्यमांशी ते संवाद साधत होते.

**सायबर गुन्हे**

रस्त्यांवरील गुन्ह्यंपेक्षा सायबर गुन्ह्यांचा धोका वाढतो आहे. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्राने देशातील सर्वात चांगले सायबर क्राईम सेंटर उघडले असून त्याचे कामही चांगल्या पद्धतीनं सुरू आहे. मात्र, सायबर गुन्हे घडूच नयेत यासाठी जनजागृती करणं अधिक महत्वाचं असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. जनजागृती हाच उपाय असल्यानं नव्या डिजिटल युगाची नवी डिजिटल मूल्य विकसित करावी लागतील, असही फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील पोलिस मुख्यलयात सायबर जनजागृती महिन्याचं उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अभिनेते अक्षय कुमार, अभिनेत्री राणी मुखर्जी यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'सायबर योद्धा' या लहान मुलांसाठीच्या कॉमिक बुकलेटचे प्रकाशन केले. तसंच, महाराष्ट्र पोलीस आणि महाराष्ट्र सायबर यांना सायबर जनजागृतीसाठी मदत करणाऱ्या व्यक्तींचा आणि विविध संस्थांचा सत्कारही केला. तसंच, सायबर जनजागृतीसाठी शालेय मुलांनी काढलेल्या रॅलीचा हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस/नियुक्तिपत्र**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षानुवर्षे रखडलेली अनुकंपा प्रकरणे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्यानंतर आता ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली असून, येत्या 4 ऑक्टोबर रोजी 5187 अनुकंपा उमेदवारांना शासकीय नोकरीची नियुक्तीपत्रे प्रदान केली जाणार आहेत. याचवेळी 5122 एमपीएससीद्वारे नियुक्तांनाही प्रमाणपत्र दिली जाणार असून, एकाचदिवशी 10,309 उमेदवार शासकीय नोकरीत दाखल होतील. अशाप्रकारचा हा इतिहासातील एक अनोखा कार्यक्रम ठरेल. शासकीय नोकरीत असताना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नी अथवा अपत्याला नोकरी दिली जाते. पण, कधी तांत्रिक कारणाने तर कधी प्रशासकीय दिरंगाईने या नियुक्त्या रखडत होत्या. त्यामुळे त्यांना दीर्घ प्रतिक्षा करावी लागते. अशात या संवेदनशील विषयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष घातले. त्यांनी सामान्य प्रशासन विभागाला सूचना केल्या. सातत्याने प्रशासकीय बैठकांमध्ये त्याचा आढावा घेतला आणि

नवीन अनुकंपा धोरण तयार करण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून अनुकंपा प्रतिक्षायादीतील 5187 अनुकंपा उमेदवारांना एकाचवेळी नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत. यामुळे अनुकंपाचा एक मोठा अनुशेष संपुष्टात येणार आहे. उद्या मुख्य कार्यक्रम हा मुंबईत होईल आणि त्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित असतील, तर पालकमंत्री आपआपल्या जिल्ह्यात नियुक्तीपत्रे वितरित करतील. यासोबतच एमपीएससीतर्फे परीक्षा घेण्यात आलेल्या लिपीक-टायपिस्ट श्रेणीतील 5122 उमेदवारांना सुद्धा नियुक्तीपत्रे दिली जाणार आहेत. एकूण 10,309 उमेदवारांपैकी सर्वाधिक 3078 उमेदवार हे कोकण विभागातील असून, 2597 हे विदर्भातील आहेत. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातून २०२ अनुकंपाधारक तर ८३ सरळसेवा भरती उमेदवारांचा समावेश आहे. तर, भंडारा जिल्ह्यातून १६६ अनुकंपा धारक उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान केली जातील.

**'ई-बॉन्ड' बावनकुळे**

महाराष्ट्रातील व्यापार व उद्योग जगताला मोठा दिलासा देत, राज्य सरकारने आयात-निर्यात व्यवसायातील पारंपरिक कागदी बॉन्ड बंद करून त्याऐवजी 'ई-बॉन्ड' प्रणाली सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा दुवा ठरणारे हे पाऊल असून, व्यवहार सुलभ करणाऱ्या प्रक्रियेला गती देईल. असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. ई-बॉन्ड सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील सोळावे राज्य असून, आयात निर्यात व्यवहारासाठी वापरण्यात येत असलेले कागदी स्वरूपातील स्टॅम्प पेपर आजपासून बंद झाल्याचेही ते म्हणाले. बावनकुळे म्हणाले, सध्या आयात-निर्यात व्यवसायांसाठी दर महिन्याला सुमारे तीन ते चार हजार बॉन्ड काढले जातात, ज्यामुळे वर्षाकाठी चाळीस हजारांहून अधिक बॉन्ड स्वीकारले जातात. या सर्व मोठ्या व्यवहारात आता ई-बॉन्डमुळे क्रांती होणार आहे. ही प्रक्रिया प्रथमदर्शनी लहान वाटत असली तरी, महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक महत्त्वाचा टर्निंग पॉईंट ठरेल.

**पुस्तके खरेदी**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमीत्त नागपुरातील दीक्षाभूमीवर आलेल्या हजारो बौद्ध अनुयायांकडून मोठ्या प्रमाणात पुस्तकांची खरेदी केली जात आहे. गेल्या 3 दिवसात सुमारे 5 कोटी रुपयांचा पुस्तकांची विक्री झाली असून सवलतींचा दरात पुस्तके मिळत असल्याने पुस्तके खरेदी करण्यासाठी सर्वच बुक डेपो मध्ये गर्दी दिसत आहे. बौद्ध अनुयायी आपल्या घराकडे निघतांना बाबासाहेबांचे विचार, मूल्य, शिकवण, तत्वज्ञान पुस्तकांचा माध्यमातून ग्रहण करून आपला आणि आपल्या समाजाचा विकास साधन्यायासाठी दरवर्षी दीक्षाभूमीवर असे चित्र बघायला मिळते.

**‘खासदार सांस्कृतिक’ निवड चाचणी**

ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधीला यावर्षी 750 वर्ष पूर्ण झाली आहेत. त्याअनुषंगाने खासदार सांस्कृतिक महोत्सव समिती नागपूर, बालकला अकादमी व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार सांस्कृतिक महोत्सव - 2025 मध्ये यावर्षी संत

ज्ञानेश्वरांचया जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांची गायन, वादन, नृत्य व अभिनय यासाठीची निवड चाचणी रविवार, 5 ऑक्टोबर 2025 रोजी सकाळी 9 वाजता सेवासदन सक्षम विद्यालय, सीताबर्डी येथे घेण्यात येणार आहे. वर्ग तिसरी ते दहावी पर्यंतचे या निवड चाचणीत सहभागी होऊ शकतात.

**नागपूर महानगरपालिका**

नागपूर महानगरपालिकेच्या लक्ष्मीनगर झोन क्र. १ अंतर्गत मालमत्ता कर थकवणाऱ्यांवर धडक कारवाई सुरू आहे. या अंतर्गत आय.टी. पार्क परिसरामधील मे. प्रिमीयर टेक्नॉलॉजी प्रा. लि. या कंपनीने सन २०२३ ते २०२५ या कालावधीतील मालमत्ता कराचा भरणा न केल्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. सदर मलामत्ता धारकावर एकूण १३ लाख ५४ हजार ९६३ रुपये इतकी मालमत्ता कराची थकबाकी होती.

**'मन की बात' ११ वर्षे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मासिक रेडिओ कार्यक्रम 'मन की बात' ला आज ११ वर्षे पूर्ण झाली. 'मन की बात' चा पहिला भाग ३ ऑक्टोबर २०१४ रोजी विजयादशमीच्या निमित्ताने प्रसारित झाला होता. अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याच्या १२६ व्या भागात देशाला संबोधित केलं. हा कार्यक्रम केवळ एक रेडिओ कार्यक्रम नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक बदलाचं प्रतीक असून, तो देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. हा कार्यक्रम सरकार आणि नागरिकांमध्ये थेट संवाद स्थापित करतो, सामाजिक बदलांना प्रेरणा देतो आणि राष्ट्रीय एकता मजबूत करतो. 'मन की बात' ने धोरणांचं केवळ जनआंदोलनांमध्ये रूपांतर केलं नाही, तर नेत्याचा आवाज देशाच्या कानाकोपऱ्यात कसा पोहोचू शकतो हे देखील दाखवून दिल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**पाणी पुरवठा**

वर्धा शहरालगतच्या पिपरी मेघे आणि १३ गावांना नियमित पाणीपुरवठा होत नाही. तसेच अनेक कुटुंबांना नळ जोडण्या देण्यात आल्या नाही. या गावांच्या पाणीपुरवठ्यातील अडचणी दुर करुन नियमित पाणी उपलब्ध करुन द्या, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्र्यांनी शहरालगतच्या गावांना सुरळीत पाणी पुरवठा, वर्धा शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजना व वीज वितरण कंपनीच्या विविध विषयांचा आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

*****